N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** शिवाजीनगर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0285 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**19/05/2025 23:29

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 19/05/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/05/2025
**Time From (वेळेपासून):** 15:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 19/05/2025 **Time (वेळ):** 23:21 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 040
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/05/2025 23:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** कार्यकारी अभियंता, सार्वजनिक ब

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री.कैलास गंगाधर पोकळे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1972
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आष्टी ताआष्टी जिबीड,शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आष्टी ताआष्टी जिबीड,शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9421338901

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.कृष्णा वसुदेव मुंडे | | | 1. बीड ,शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ:क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | एक मेमरी कार्ड, 5000/ रुपये रोख व एक पन्ट. | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दिनांक 19/05/2025.

अॅसीबी कार्यालय, बीड.

मी कैलास गंगाधर पोकळे, वय-53 वर्षे,व्यवसाय शेती व संस्था चेअरमन रा.आष्टी ता.आष्टी जि.बीड मो.नं. 9421338901 आधार क्रमांक- 7989 9430 3509.

मी दिनांक 19/05/2025 रोजी पोलीस निरीक्षक श्री.किरण बगाटे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांचे समक्ष चऱ्हाटा रोड, पालवण शिवार ता.जि.बीड येथे सुरक्षीत तिकाणी तक्रार दिली की, "माझे जगदंबा देवी मजुर सहकारी संस्था मर्यादीत, बेलगाव ता.आष्टी जि.बीड या संस्थेचे "अ" वर्ग अकुशल वर्गीकरण / नुतणीकरण पत्र देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.2 बीड येथील लिपीक श्री.मुंडे हे 5,000/- रुपये लाचेची मागणी करीत आहेत" वगैरे मजकुराची तक्रार दिली.

मी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 19/05/2025 रोजी पोलीस निरीक्षक, श्री.किरण बगाटे यांनी लिपीक श्री.मुंडे हे माझ्याकडे माझे कामासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत पडताळणी करण्याचे ठरविले. लिपीक श्री. मुंडे,यांची भेट घेण्याकरीता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 बीड चे नगर रोडवरील कार्यालयात मला व पंच क्र.1 श्री.शेख आलताफ यांना पाठवुन व्हाईस रेकॉर्डरचे मदतीने लाचमागणी पडताळणी करण्यात आली. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 बीड येथे कार्यालयात गेल्यानंतर मला तेथे लिपीक श्री.मुंडे हे न दिसल्याने मी त्यांना फोन लावुन कोठे आहेत, या बाबत विचारणा केली असता त्यांनी मला कार्यालयात येत असल्याचे सांगितले. त्यानंतर काही वेळाने लिपीक श्री.मुंडे हे कार्यालयात आले. लिपीक श्री.मुंडे व माझी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 बीड चे श्री.मुंडे यांचे कक्षात भेट झाली. त्यावेळी आमचे मध्ये माझ्या जगदंबा देवी मजुर सहकारी संस्था मर्यादीत, बेलगाव ता.आष्टी जि.बीड या संस्थेचे "अ" वर्ग अकुशल वर्गीकरण / नुतणीकरण बाबत चर्चा झाली. त्यावेळी श्री.मुंडे यांनी मला माझ्या मजुर संस्थेचे "अ" वर्ग अकुशल वर्गीकरण / नुतणीकरण पत्राच्या चार प्रती देवुन दुय्यम प्रतीवर माझी सही घेऊन त्यांच्या उजव्या हाताचा आंगठा हातावरील इतर बोटावर घासुन पैशाची मागणी केली. त्यावर मी श्री.मुंडे यांना " किती द्यायचे " असे विचारले असता त्यांनी मला " द्या काय त्याला.. तुम्ही काय नवीन थोडीत.. काय पहिले सर्कलला लागायचे पाच सहा.. रेग्युलर मधीच सांगायलोय.. तरी मी तुम्हाला फक्त सर्कलच करायच सांगितलय " असे म्हणुन पाच-सहा हजाराची मागणी केली. त्यावर मी श्री.मुंडे यांना "पाच सहा हजार लय होयलेत.. पाच मधी करा " असे म्हणालो असता श्री.मुंडे यांनी मला "बर ठीकय.. " असे म्हणुन माझ्याकडुन 5000/- रुपये लाचेची मागणी करुन 5,000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरुन श्री.किरण बगाटे यांनी लिपीक, श्री.मुंडे यांचे विरुध्द लागलीच लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असुन वेळे अभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रीत पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यावरुन श्री.किरण बगाटे यांनी सापळा कारवाईसाठी अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचांना माहिती देऊन सुरक्षीत स्थळी चऱ्हाटा रोड, पालवण शिवार ता. जि.बीड येथे शासकीय वाहनात प्रात्यक्षीक करुन दाखवले. श्री.किरण बगाटे यांनी मला व पंचांना नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर मी सापळा कारवाईसाठी लागणारी आवश्यक लाच रक्कम 5,000/- रुपये ज्यामध्ये 500/-रुपये दराच्या 10 नोटा श्री.किरण बगाटे यांचेकडे हजर केल्या. श्री.किरण बगाटे यांनी लाचेच्या नोटांचे क्रमांक पंच क्रमांक 2 श्री.दाभाडे यांचे करवी नमुद करुन घेऊन लाच रकमेस अँथ्रासीन पावडर लावुन लाच रक्कम माझे पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवुन मला लाच स्विकृतीनंतर श्री.किरण बगाटे यांना

फोन करुन "निघालोत आता कलेक्टर ऑफिस वरुन या" असा बोलण्याचा इशारा नेमुन दिला.
सापळापुर्व कारवाईचा पंचनामा पुर्ण झाल्यानंतर मला व दोन्ही पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे देऊन मला व पंच क्र.1 श्री.शेख अलताफ यांना लिपीक, श्री.मुंडे यांना लाच रक्कम देण्यासाठी माझ्याकडील चारचाकी वाहनाने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 बीड येथे रवाना करण्यात आले. आमचे पाठोपाठ श्री.किरण बगाटे, सापळा पथक व पंच क्र.2 श्री.दाभाडे हे शासकीय वाहनाने येत होते. मी व पंच क्र.1 शेख अलताफ असे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 बीड येथील श्री.मुंडे यांचे कक्षामध्ये गेलो. तेथे माझी व श्री.मुंडे यांची भेट होवुन माझे कामा विषयी चर्चा झाली. चर्चे दरम्यान लिपीक श्री.मुंडे यांनी लाचेची मागणी केल्याने मी लाच रक्कम 5,000 /- ही माझे पॅन्टचे समोरील उजवे खिशातुन उजवे हाताने काढुन लिपीक, श्री.मुंडे यांचे समोर धरली असता, लिपीक श्री.मुंडे यांनी लाच रक्कम 5,000/- रुपये उजवे हाताने स्विकारुन अंगावर परिधान केलेल्या पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवुन दिली. त्यावेळी मी लागलीच श्री.किरण बगाटे यांना फोन करुन मला लाच स्विकृतीनंतर करावयाचानेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 15.00 वा. केला.
इशारा प्राप्त होताच श्री.किरण बगाटे हे सापळा पथकासह माझ्याजवळ आले. पोलीस अंमलदार श्री.गोरे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. तेव्हा श्री.किरण बगाटे यांनी लिपीक श्री.मुंडे यांना त्यांची स्वतःची, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर श्री.किरण बगाटे यांनी पंच क्र.1 श्री.शेख अलताफ यांना पंच क्र.2 दाभाडे यांचेसमक्ष विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझे कडुन कोणी लाच रक्कम स्विकारली. तेव्हा पंच क्र.1 श्री.शेख अलताफ यांनी सांगितले की, "तक्रारदार यांना लिपीक श्री.मुंडे यांनी लाचेची मागणी केली असता, तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशातुन लाच रक्कम 5000/- रुपये उजवे हाताने बाहेर काढुन लिपीक श्री.मुंडे यांचे समोर धरले असता लिपीक श्री.मुंडे यांनी लाच रक्कम 5000/- रुपये उजवे हाताने स्विकारुन त्यांचे अंगावरील पॅन्टच्या समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवले असल्याचे सांगितले. त्यावर श्री.किरण बगाटे यांनी पंच क्रं. 2 श्री.दाभाडे यांना लिपीक श्री.मुंडे यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशातुन बाहेर काढुन लाच रक्कम 5,000/- रु. ताब्यात घेण्यास सांगितले. त्यावर पंच क्र. 2 श्री.दाभाडे यांनी लिपीक श्री.मुंडे यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशातुन लाच रक्कम 5,000/-रु. बाहेर काढुन नोटांचे वर्णन व क्रमांकाची पंच क्र.1 यांचे मदतीने खात्री केली असता सदर नोटांचे क्रमांक व वर्णन हे सापळा पुर्व कारवाई मधील नमुद नोटांचे क्रमांक व वर्णन हे एकच असल्याचे सांगितले. त्यानंतर श्री.किरण बगाटे यांनी लिपीक श्री.मुंडे यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता, त्यांनी त्यांचे नाव श्री.कृष्णा वसुदेव मुंडे, वय 38 वर्षे, व्यवसाय नोकरी, कनिष्ठ लिपीक, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 बीड जि.बीड रा.यादव यांचे घरी, तुळजाई चौक ता.जि.बीड (वर्ग-3) असे सांगितले. माझे जगंदबा देवी मजुर सहकारी संस्था मर्यादीत, बेलगाव ता.आष्टी जि.बीड या संस्थेचे "अ" वर्ग अकुशल वर्गीकरण / नुतणीकरणचे प्रस्तावाची मुळ कागदपत्राची फाईल लिपीक श्री.मुंडे यांचेकडुन श्री.किरण बगाटे यांनी ताब्यात घेतली. त्यानंतर आपण घटनास्थळावर प्राथमीक कारवाई करुन लिपीक श्री.मुंडे यांना ताब्यात घेऊन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे आलोत. केलेल्या कारवाईचा एकत्रित लाचमागणी पडताळणी, सापळा पुर्व व यशस्वी सापळा कारवाई पंचनामा करण्यात आला आहे.
तरी श्री.कृष्णा वसुदेव मुंडे, वय 38 वर्षे, व्यवसाय नोकरी, कनिष्ठ लिपीक, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 बीड जि.बीड यांनी आज दिनांक 19/05/2025 रोजी 11.04 ते 12.16 वा. चे दरम्यान या माझ्या जगंदबा देवी मजुर सहकारी संस्था मर्यादीत, बेलगाव ता.आष्टी जि.बीड या संस्थेचे "अ" वर्ग अकुशल वर्गीकरण / नुतणीकरणचे पत्र देण्यासाठी 5000/- रुपये लाचेची मागणी करुन आज दिनांक 19/05/2025 रोजी 15.00 वा. सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.2 बीड येथील कार्यालयात शासकीय पंचासमक्ष लाच रक्कम 5,000/- रुपये स्विकारली असता श्री.कृष्णा मुंडे यांना लाचेच्या रकमेसह पकडुन लाच रक्कम 5,000/-रु. पंचांसमक्ष जप्त करण्यात आलेली आहे. म्हणुन माझी श्री.कृष्णा वसुदेव मुंडे, वय 38 वर्षे, व्यवसाय नोकरी, कनिष्ठ लिपीक, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 2 बीड जि.बीड यांचे विरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Maruti Bhimsen Khedkar(I (Inspector)) / 1460100450MBKM7901G **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला) .

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.ठा.अंमलदार
पो.स्टे.शिवाजीनगर, बीड

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Maruti Bhimsen Khe
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 1460100450MBKM7901